RNI No. MAHBIL /2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–अ–मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक २७] शुक्रवार, मे ८, २०१५/वैशाख १८, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ५२

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे २०१५

**आदेश**

**महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) (सुधारणा) आदेश, २०१५.**

क्रमांक रानिआ./रापनों-२०१५/प्र.क्र. ६/का-११.— ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए अन्वये राज्यातील पंचायती व पालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील पंचायती व पालिकांच्या निवडणुका घेणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, पारदर्शकतेने आणि प्रभावीपणे पार पाडण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांना चिन्हांचे विनिर्देश, आरक्षण, निवड व वाटप यासंबंधी अनुषंगिक बाबींसंबंधात महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९, दिनांक ३१ मार्च २००९ अन्वये तरतुदी केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९, दिनांक ३१ मार्च २००९ च्या परिच्छेद १० मध्ये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या पक्षांच्या नावांची यादी **शासन राजपत्रात** समाविष्ट करण्यासाठी दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९, दिनांक ३१ मार्च २००९ च्या आदेशातील परिच्छेद १० ऐवजी, पुढीलप्रमाणे सुधारित परिच्छेद १० समाविष्ट करण्यात येत आहे.

"**१०. राजकीय पक्षांची व चिन्हांची सूची तसेच मुक्त चिन्हांची सूची असलेली अधिसूचना.**—आयोग, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या एका किंवा अधिक अधिसूचनेद्वारे खालील माहिती विनिर्दिष्ट करील,—

(अ) मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(ब) महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(क) इतर राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष आणि त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(ड) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडे नोंदणी झालेले राजकीय पक्ष आणि त्यांच्या कार्यालयांचे पत्ते.

(इ) मुक्त चिन्हे."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**डॉ. प्रदीप व्यास,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

**STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA**

New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road, Mumbai 400 032, dated the 6th May 2015

**Order**

MAHARASHTRA ELECTION SYMBOLS (RESERVATION AND ALLOTMENT) (AMENDMENT) ORDER, 2015.

No. SEC./RPP-2015/C.R. 6/D-11.—Whereas, the responsibility of superintedence, direction and control of all elections to the Panchayats and Municipalities in the State is vested in the State Election Commission, Maharashtra under Articles 243K and 243-ZA of the Constitution of India ;

And Whereas, in the interest of holding elections to the Panchayats and Municipalities in the State and Conduct of such elections in free, fair, transparent and efficient manner, the State Election Commission, Maharashtra by Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment) Order, dated the 31st March 2009 as amended from time to time has made certain provisions, to provide for certain matters incidental to the specification, reservation, choice and allotment of symbols for political parties and for matters connected therewith ;

And Whereas, it is necessary to amend Paragraph 10 of the Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment) Order, 2009 dated the 31st March 2009, to include the list of the political parties registered with the State Election Commission ;

Therefore, the Paragraph 10 in the Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment) Order, 2009 is substituted by the followiong amended paragraph 10.

"*10. Notification containing list of Political Parties with reserve symbols and free symbols.*— The Commission shall by one or more notifications published in the *Government of Maharashtra Gazette* specify following information,—

(*a*) Recognised National Parties and Symbols reserved for them.

(*b*) Recognised State Level Parties in Maharashtra and Symbols reserved for them.

(*c*) Recognised Parties in other States and Symbols reserved for them.

(*d*) Political Parties registered with the State Election Commission, Maharashtra and their official address.

(*e*) Free Symbils."

By order of the State Election Commissioner,

DR. PRADEEP VYAS,
Secretary,
State Election Commission,
Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.